COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २**

# महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२

( दिनांक २४ जानेवारी, २०११ पर्यंत सुधारित )

Maharashtra Act No. II Of 2004

# Maharashtra State Council for Occupational Theorapy And Physiotherapy Act, 2002

(As Modified upto the 24th January, 2011)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित.

2012

**[किंमत : रु. २२-००]**

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

### सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २

# महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२

## अनुक्रमणिका


**उद्देशिका.**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

| कलमे. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. .. .. .. | २ |
| २. | व्याख्या. .. .. .. | २ |

प्रकरण दोन

**परिषदेची रचना**

| | | |
|---|---|---|
| ३. | परिषदेची रचना व तिचे कायद्याने संस्थापन. .. .. .. | ४ |
| ४. | पदावधी. .. .. .. | ५ |
| ५. | नैमित्तिक रिकामी पदे. .. .. .. | ६ |
| ६. | राजीनामा. .. .. .. | ६ |
| ७. | निरर्हता. .. .. .. | ६ |
| ८. | परिषदेच्या बैठकी. .. .. .. | ७ |
| ९. | बैठकींमधील कामकाज. .. .. .. | ८ |
| १०. | कार्यकारी समिती आणि इतर समित्या. .. .. .. | ८ |
| ११. | समकक्ष नोंदणी समिती. .. .. .. | ९ |
| १२. | परिषदेच्या कार्यकारी समितीच्या आणि समकक्ष व नोंदणी समितीच्या सदस्यांना द्यावयाची फी व भत्ते. .. | ९ |
| १३. | परिषदेचे उत्पन्न व खर्च. .. .. .. | ९ |
| १४. | परिषदेच्या प्रबंधकाची नेमणूक, त्याची कर्तव्ये व कामे. .. .. | ९ |
| १५. | परिषदेचे इतर कर्मचारी. .. .. .. | १० |

प्रकरण तीन

**परिषदेची कार्ये**

| | | |
|---|---|---|
| १६. | परिषदेचे अधिकार, कर्तव्ये आणि कामे. .. .. .. | ११ |
| १७. | नवीन संस्था स्थापन करणे, नवीन अभ्यास पाठ्यक्रम इत्यादींसाठी परवानगी. .. | ११ |
| १८. | विवक्षित प्रकरणांत अर्हतेस मान्यता न देणे. .. .. .. | १३ |
| १९. | विवक्षित विद्यमान संस्थांसाठी परवानगी मागण्याचा कालावधी. .. .. | १४ |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## **अनुक्रमणिका--**(पुढे चालू)


| **कलमे** | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २०. | व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार व्यावसायिकांसाठी भारतातील किंवा विदेशातील विद्यापीठे, इत्यादींनी दिलेल्या अर्हतांची मान्यता. | .. | १४ |
| २१. | मान्यतेचा प्रभाव. .. .. | .. | १४ |
| २२. | अभ्यास पाठ्यक्रम व प्रशिक्षण आणि परीक्षा याविषयीची माहिती मागवण्याचा अधिकार. .. .. | .. | १५ |
| २३. | निरीक्षक. .. .. | .. | १५ |
| २४. | मान्यता काढून घेणे. .. .. | .. | १६ |
| २५. | व्यावसायिक वर्तणूक. .. .. | .. | १६ |
| २६. | पुरवावयाची माहिती. .. .. | .. | १७ |
| | प्रकरण चार<br>**नोंदवही तयार करणे व ठेवणे** | | |
| २७. | नोंदवही तयार करणे. .. .. | .. | १७ |
| २८. | नोंदवहीतून नावे काढून टाकणे. .. .. | .. | १८ |
| २९. | नोंदवहीतून नावे काढून टाकण्याच्या आदेशाविरुध्द अपील. | .. | १९ |
| ३०. | नोंदणीकृत सदस्यांचे अधिकार आणि विशेषाधिकार. .. | .. | १९ |
| ३०क. | प्रस्थापित व्यवसायींना हाड बसवण्याचा आणि मालिशने उपचार करण्याचा त्यांचा पारंपारिक व्यवसाय चालू ठेवण्यास परवानगी देणे. | .. | २० |
| | प्रकरण पाच<br>**अपराध व शास्ती** | | |
| ३१. | अनधिकृत व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून पदव्युत्तर पदवी, लायसन, इत्यादी प्रदान करणे, मंजूर करणे किंवा देणे. | .. | २१ |
| ३२. | कलम ३१ च्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेल्या कृतीबद्दल शास्ती. | .. | २१ |
| ३३. | अपराधाची दखल घेणे. .. .. | .. | २२ |
| ३४. | हक्काचा गैरवापर. .. .. | .. | २२ |
| ३५. | नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात कसूर करणे. .. | .. | २२ |
| | प्रकरण सहा<br>**संकीर्ण** | | |
| ३६. | शासनाचे निदेश. .. .. | .. | २२ |
| ३७. | परिषदेस निष्प्रभावित करण्याचा अधिकार. .. | .. | २२ |
| ३८. | सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण. .. | .. | २३ |
| ३९. | नियम करण्याचा अधिकार. .. .. | .. | २३ |
| ४०. | विनियम करण्याचा अधिकार. .. .. | .. | २४ |
| ४१. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. .. | .. | २४ |

**अनुसूची-एक**

**अनुसूची-दोन**


----------

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २

# महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२

(या अधिनियमाला मा. राज्यपालांची दिनांक ७ जानेवारी, २००४ रोजी अनुमती मिळाल्यानंतर तो **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १२ जानेवारी, २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.)

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ (२५ ऑगस्ट, २००५)†

**व्यवसायोपचार व भौतिकोपचार क्षेत्रातील शिक्षणाच्या दर्जाचे समन्वयन व निर्धारण करण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेची रचना करण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्यासाठी व्यवसायोपचारक व भौतिकोपचारक नोंदवही ठेवण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** व्यवसायोपचार व भौतिकोपचार क्षेत्रातील शिक्षणाच्या दर्जाचे समन्वयन व निर्धारण करण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेची रचना करण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्यासाठी व्यवसायोपचारक व भौतिकोपचारक नोंदवही ठेवण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे. :—

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेस अंमलात येईल :

परंतु, या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळ्या तारखा नेमून देण्यात येतील आणि अशा कोणत्याही तरतुदींमधील या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या निर्देशाचा अर्थ, त्या तरतुदी अंमलात आल्याच्या दिनांकाचा निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "नेमलेला दिवस" याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदी, कलम १, पोट-कलम (३) अन्वये ज्या तारखेस अंमलात येतील, ती तारीख, असा आहे ;

(ख) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये रचना केलेली महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, असा आहे ;

[१][(ख-१) "सूचीदाखल व्यवसायी" याचा अर्थ, कलम ३०-क च्या पोट-कलम (२) अन्वये परिषदेने प्रसिद्ध केलेल्या व ठेवलेल्या सूचीमध्ये नाव दाखल केलेला पारंपरिक व्यवसायी, असा आहे ;]

(ग) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(घ) "निरीक्षक" याचा अर्थ, परिषदेने कलम २३ अन्वये नियुक्त केलेला निरीक्षक, असा आहे ;

[२][(घ-१) "सूची" याचा अर्थ, कलम ३०-क च्या पोट-कलम (२) अन्वये सूचीदाखल व्यवसायीची परिषदेने प्रसिद्ध केलेली आणि ठेवलेली सूची, असा आहे ;]

(ङ) "सदस्य" याचा अर्थ, परिषदेचा सदस्य, असा आहे ;

(च) "व्यवसायोपचारक" याचा अर्थ, जिने अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मान्यताप्राप्त संस्थेमधून व्यवसायोपचारविषयक अर्हता धारण केलेली आहे आणि जिचे नाव व्यवसायोपचारक नोंदवहीत नोंदविण्यात आले आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(छ) "व्यवसायोपचार" याचा अर्थ, आरोग्य देखभाल पद्धतीची एक शाखा, असा असून त्यात, रोगनिदानासाठी [३][ * * * *] नवीनतम तंत्रज्ञानाद्वारे लक्ष्याभिमुख उपयुक्त अशा उपचारांचा अंतर्भाव होतो. तसेच ज्या व्यक्तींच्या क्रियाशीलतेत, गंभीर व दीर्घकालीन स्वरुपाच्या शारीरिक आजारपणामुळे

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम २(क) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २(ख) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २(ग) द्वारे "संगणक यंत्रणा किंवा तत्सम" हा मजकूर वगळण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



किंवा दुखापतीमुळे, मानसिक क्रियादोषामुळे, जन्मजात किंवा त्यानंतर निर्माण झालेल्या विकलांगतेमुळे किंवा वयपरत्वे, बिघाड झालेला आहे अशा व्यक्तींवर, त्यांना शक्य तेवढे जास्त कार्यक्षम करण्यासाठी, त्यांच्या विकलांगतेचे निवारण करण्यासाठी आणि त्यांचे आरोग्य सुस्थितीत राखण्यासाठी उपचारांचाही समावेश होतो. विवक्षित व्यवसायोपचार सेवांमध्ये, दैनंदिन व्यवहाराविषयीचे (एडीएल) शिक्षण व प्रशिक्षण देणे; हाडांना बांधावयाच्या भाळ्यांचे (स्प्लीन्ट) संकल्पचित्र तयार करणे, त्या बनवणे व बसविणे; वापर करावयाच्या साधनसामग्रीच्या निवडीविषयी व वापराविषयी मार्गदर्शन करणे; क्रियाशिलता वाढवण्यासाठी उपचार करणे ; व्यवसायपूर्ण मूल्यमापन करणे व प्रशिक्षण देणे; आणि भौतिक पर्यावरणाशी सांगड घालण्यासंबंधी समुपदेशन करणे, यांचा समावेश होतो. अशा सेवा, व्यक्तींना किंवा गटांना आणि आंतररुग्ण व बाह्यरुग्ण या दोघांनाही देण्यात येऊ शकतात;

(ज) "भौतिकोपचारक" याचा अर्थ, जिने या अधिनियमाच्या अनुसूची दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मान्यताप्राप्त संस्थेमधून भौतिकोपचारविषयक अर्हता धारण केलेली आहे आणि जिचे नाव भौतिकोपचारक नोंदवहीत नोंदविण्यात आले आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(झ) "भौतिकोपचार" याचा अर्थ, आधुनिक वैद्यकशास्त्राची एक शाखा, असा आहे आणि त्यात तपासणी, निर्धारण, निर्वचन, शारीरिक रोगनिदान, उपचारांचे नियोजन व उपचार करणे आणि अतिदक्षता विभागामध्ये उरोभौतिकोपचाराद्वारे केलेल्या जीव संरक्षक उपाययोजनांसह कार्यदोष, गंभीर व दीर्घकालीन शारीरिक बिघाड, शारीरिक विकृती किंवा विकलांगता दूर करण्याच्या, दुरुस्त करण्याच्या, कमी करण्याच्या व मर्यादित करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीस सल्ला देणे यांचा समावेश होतो आणि त्यात, शारीरिक स्वास्थ वाढवणे, जखमा भरुन येण्यासाठी व वेदना मुक्ती करण्यासाठी साह्यकारी उपाय करणे, व्यायाम, चलनवलन, हातकाम, उपचारात्मक अल्ट्रासाऊंड, विद्युत औष्णिककारक व विद्युतोपचार यासह भौतिक साधनांचा, कृतींचा आणि पद्धतींचा रोगनिदान करण्यासाठी, निवारण करण्यासाठी व उपचार करण्यासाठी वापर करुन त्याद्वारे मानसिक व शारीरिक प्रतिसादांचे नियमन करणे व शारीरिक व मानसिक विकारांवर उपचार करणे, यांचा समावेश होतो ;

(ञ) "विहीत" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ट) "अध्यक्ष" याचा अर्थ, परिषदेचा अध्यक्ष, असा आहे ;

(ठ) "व्यवसाय" याचा अर्थ, व्यवसायोपचारांचा किंवा यथास्थिति, भौतिकोपचाराचा व्यवसाय, असा आहे ;

(ड) "मान्यताप्राप्त संस्था" याचा अर्थ, व्यवसायोपचारविषयक अर्हता देणारी, अनुसूची-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेली संस्था किंवा यथास्थिति, भौतिकोपचारविषयक अर्हता देणारी अनुसूची-दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेली संस्था, असा आहे ;

(ढ) "मान्यताप्राप्त व्यवसायोपचारविषयक अर्हता "किंवा" मान्यताप्राप्त भौतिकोपचारविषयक अर्हता'' याचा अर्थ, अनुक्रमे अनुसूची-एक किंवा अनुसूची-दोन मध्ये नोंदविण्यात आलेल्या मान्यताप्राप्त व्यवसयोपचार संस्थेतून किंवा मान्यताप्राप्त भौतिकोपचार संस्थेतून प्राप्त केलेली व्यवसायोपचारविषयक, किंवा यथास्थिति, भौतिकोपचारविषयक अर्हता, असा आहे ;

(ण) "नोंदवही" याचा अर्थ, या अधिनियमान्वये परिषदेने तयार केलेली आणि ठेवलेली व्यवसायोपचारकांची नोंदवही, किंवा यथास्थिति, भौतिकोपचाराकांची नोंदवही, असा आहे ;

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(त) "नोंदणीकृत व्यवसायी" याचा अर्थ, ज्याचे नाव परिषदेच्या नोंदवहीत दाखल केलेले आहे आणि कायमस्वरुपी दाखल आहे, असा व्यवसायोपचारक किंवा यथास्थिति, भौतिकोपचारक, असा आहे ;

(थ) "प्रबंधक" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १४ अन्वये नेमण्यात आलेला परिषदेचा प्रबंधक, असा आहे ;

(द) "विनियम" याचा अर्थ, कलम ४० अन्वये परिषदेने केलेले विनियम, असा आहे ;

(ध) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे ;

(न) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली व्यवसायोपचारविषयक अनुसूची-एक किंवा भौतिकोपचारविषयक अनुसूची-दोन, असा आहे ;

(प) "राज्य" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ; आणि

(फ) "उपाध्यक्ष" याचा अर्थ, परिषदेचा उपाध्यक्ष, असा आहे.

---

## प्रकरण दोन

## **परिषदेची रचना**

**परिषदेची रचना व तिचे कायद्याने संस्थापन.**

**३.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, होईल तितक्या लवकर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार आणि भौतिकोपचार परिषद या नावाने ओळखली जाणारी एक परिषद स्थापन करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेली परिषद ही, एक अखंड परंपरा व सामान्य मुद्रा असलेला निगम निकाय असेल आणि तिला जंगम व स्थावर दोन्ही मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा किंवा तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उपरोक्त निगम नावाने तिला किंवा तिच्यावर दावा लावता येईल.

(३) परिषद पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, पदसिद्ध सदस्य ;

(ख) व्यवसायोपचारकाच्या नोंदवहीमध्ये नावनोंदणी केलेल्या नोंदणीकृत व्यवसायींनी आपणामधून निवडून द्यावयाचे दोन व्यवसायोपचारक, सदस्य ;

(ग) भौतिकोपचारकांच्या नोंदवहीमध्ये नावनोंदणी केलेल्या नोंदणीकृत व्यवसायींनी आपणामधून निवडून द्यावयाचे चार भौतिकोपचारक, सदस्य ;

परंतु, खंड (ख) आणि (ग) मध्ये निर्देशिलेल्या सदस्यांची निवडणूक विहित करण्यात येईल अशा वेळी आणि अशा ठिकाणी आणि अशा रीतीने होईल :

[१][परंतु आणखी असे की, खंड (ख) आणि (ग) मध्ये उल्लेख केलेल्या सदस्यांना निवडून देण्यासाठीची पहिली निवडणूक, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत घेण्यात येईल ; ]

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ३(क) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



[१][परंतु तसेच] हा अधिनियम अंमलात आल्यावर, अशा नोंदणीकृत सदस्यांच्या निवडणुकीकरिता या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरुन नोंदवही तयार होईपर्यंत, खंड (ख) आणि (ग) मध्ये निर्देश केलेले सदस्य निवडणूक आणि निवडून आलेल्या सदस्यांची नेमणूक होईपर्यंत, शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील ;

(घ) राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधील, शासनाकडून नामनिर्देशित करावयाचा एक व्यवसयोपचारक ;

(ङ) राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधील, शासनाकडून नामनिर्देशित करावयाचा एक भौतिकोपचारक ;

(च) शासनाकडून नामनिर्देशित करण्यात यावयाची, व्यवसायोपचार क्षेत्रामधील एक व्यक्ती आणि भौतिकोपचार क्षेत्रातील एक व्यक्ती ;

(छ) कलम १४ अन्वये नेमण्यात आलेला प्रबंधक हा सदस्य-सचिव असेल.

(४) परिषदेचे सदस्य आपणामधून अध्यक्ष निवडून देतील.

(५) परिषदेच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेले दोन उपाध्यक्ष असतील व त्यातील एक व्यवसायोपचारकाचे प्रतिनिधित्व करील आणि दुसरा भौतिकोपचारकाचे प्रतिनिधित्व करील व त्यांना अनुक्रमे उपाध्यक्ष (व्यवसायोपचार) आणि उपाध्यक्ष (भौतिकोपचार) म्हणून ओळखण्यात येईल.

(६) यथास्थिति, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पद धारण करणारी व्यक्ती किंवा पद धारण केलेली व्यक्ती, या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, त्या पदाच्या फेर निवडणुकीकरिता पात्र असेल.

(७) जर पोट-कलम (३) च्या खंड (ख) किंवा (ग) खालील कोणत्याही निवडणुकीत, मतदारांनी आवश्यक त्या संख्येइतक्या सदस्यांची निवड करण्यात कसूर केली असेल तर, राज्य शासन, अशी एक किंवा अनेक रिकामी पदे भरण्यासाठी म्हणून, त्यास योग्य वाटेल अशा नोंदणीकृत व्यवसायीस किंवा व्यवसायींना नामनिर्देशित करील ; आणि अशा रीतीने नामनिर्देशित करण्यात आलेले व्यवसायी हे, या कलमान्वये रीतसर निवडून आले असल्याचे समजण्यात येईल.

(८) एखाद्या सदस्याच्या किंवा अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या कोणत्याही निवडणुकीसंबंधात एखादा विवाद उद्भवल्यास तो राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल आणि राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**पदावधी.** **४.** (१) शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निवडून आलेल्या व नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करील.

(२) या अधिनियमात अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीज करुन, एखादा सदस्य, मग तो निवडून आलेला असो किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला असो, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून पाच वर्षाच्या अवधीकरिता पद धारण करील.

(३) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करून, अध्यक्ष व उपाध्यक्ष हे त्यांच्या निवडीच्या तारखेपासून ज्या तारखेस त्यांचा सदस्य म्हणून पदावधी संपत असेल त्या तारखेपर्यंत पद धारण करतील.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) द्वारे 'परंतु आणखी असे की' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(४) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत केले असले तरी, मावळत्या सदस्याचा पदावधी, पोट-कलम (१) अन्वये ज्या दिवशी उत्तराधिकारी सदस्यांची नावे प्रसिध्द करण्यात येतील त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे आणि त्या दिवशी संपत असल्याचे समजण्यात येईल.

(५) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत केले असले तरी, मावळत्या अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा पदावधी, यथास्थिति, अशा अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा उत्तराधिकारी ज्या दिवशी निवडण्यात येईल त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे आणि त्या दिवशी संपत असल्याचे समजण्यात येईल.

(६) मावळता सदस्य पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असेल.

(७) कोणत्याही सदस्यास परिषदेकडून, सहा महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अनुपस्थिती रजा दिली जाऊ शकेल.

**नैमित्तिक रिकामी पदे.**

**५.** (१) अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचा किंवा कलम ३च्या पोट-कलम (३) चे खंड (ख) व (ग) अन्वये निवडून दिलेल्या सदस्याचा पदावधी संपण्यापूर्वी त्याचे पद मृत्यूमुळे, राजीनाम्यामुळे, निरर्हतेमुळे किंवा असमर्थतेमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे नैमित्तिकरीत्या रिकामे झाले तर, असे कोणतेही पद निवडणुकीद्वारे भरण्यात येईल ;

परंतु, सर्व सदस्यांचा पदावधी ज्या तारखेस संपत असेल त्या तारखेपूर्वीच्या सहा महिन्यांमध्ये जर निवडून आलेल्या सदस्याचे पद अशा रीतीने रिकामे झाले तर, ते भरण्यात येणार नाही.

(२) कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (घ), (ङ) आणि (च) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्याचे पद, त्याचा पदावधी संपण्यापूर्वी नैमित्तिकरीत्या रिकामे झाले तर प्रबंधक, उक्त बाब राज्य शासनास ताबडतोब कळवील आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य शासन नामनिर्देशनाद्वारे उक्त पद भरील.

(३) नैमितिकरीत्या रिकामे झालेले पद भरण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये निवडण्यात आलेली किंवा पोट-कलम (२) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, कलम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या सदस्याच्या जागी तिला निवडून देण्यात आले असेल किंवा नामनिर्देशित करण्यात आले असेल त्या सदस्याने, उक्त पद रिकामे झाले नसते तर ते जितक्या अवधीपर्यंत धारण केले असते, तितक्या अवधीपर्यंत फक्त पद धारण करील.

**राजीनामा.**

**६.** (१) अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास, परिषदेस उद्देशून दिलेल्या लेखी नोटिशीद्वारे व उक्त नोटीस निबंधकाच्या स्वाधीन करुन, कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा राजीनामा परिषदेकडून ज्या तारखेला स्वीकारण्यात येईल त्या तारखेपासून तो अंमलात येईल.

(२) निवडून आलेल्या सदस्यास, कोणत्याही वेळी अध्यक्षास उद्देशून लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. नामनिर्देशित सदस्यास कोणत्याही वेळी शासनाला उद्देशून लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा प्रत्येक राजीनामा, यथास्थिति, अध्यक्ष किंवा शासन ज्या तारखेला स्वीकारील त्या तारखेपासून तो अंमलात येईल.

**निरर्हता.**

**७.** (१) एखादी व्यक्ती सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नामनिर्देशित होण्यास आणि सदस्य

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(क) जर ती विकल मनाची असेल किंवा होईल आणि सक्षम न्यायालयाकडून तसे घोषित करण्यात आले असेल ; किंवा

(ख) नैतिक अधोगतीचा अंतर्भाव असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल ती सिद्धापराधी असेल किंवा तिला सिद्धापराधी ठरवलेले असेल व त्यामुळे शासनाच्या मते परिषदेची सदस्य म्हणून असण्यास ती अयोग्य ठरली असेल ; किंवा

(ग) जर ती अविमुक्त दिवाळखोर असेल किंवा तिला कोणत्याही वेळी अविमुक्त दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत करण्यात आले असेल ; किंवा

(घ) जर तिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल आणि पुन्हा तीमध्ये दाखल करण्यात आलेले नसेल ; किंवा

(ङ) जर ती परिषदेची पूर्णकालिक अधिकारी किंवा कर्मचारी असेल.

(२) जर कोणताही सदस्य, कलम ४ च्या पोट-कलम (७) अन्वये परिषदेने दिलेल्या परवागीशिवाय किंवा परिषदेच्या मते जी पुरेशी असतील अशा कारणांशिवाय लागोपाठच्या तीन बैठकींना गैरहजर राहिला असेल तर, परिषदेला त्याची जागा रिकामी झाल्याचे जाहीर करता येईल आणि उक्त रिकामी जागा भरण्याकरिता उपाययोजना करता येईल.

(३) जर कोणताही सदस्य पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निरर्हतांपैकी कोणत्याही प्रकारे निरर्ह झाला किंवा अशा कोणत्याही निरर्हतेस पात्र ठरल्याचे आढळून आले असेल तर, परिषद, शासनाला एक अहवाल सादर करील आणि त्याच्या निरर्हतेविषयी शासनाची खात्री झाली तर शासन त्या सदस्याची जागा रिकामी झाल्याचे जाहीर करील.

**परिषदेच्या बैठकी.**

८. (१) परिषदेच्या बैठकी विहित करण्यात येतील अशा रीतीने बोलावण्यात, घेण्यात व चालविण्यात येतील.

(२) अध्यक्ष, तो जेव्हा बैठकीस हजर असेल त्यावेळी, परिषदेच्या प्रत्येक बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील, जर कोणत्याही बैठकीत अध्यक्ष गैरहजर असेल तर, कोणताही उपाध्यक्ष आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष गैरहजर असतील तर, अशा बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेला एक सदस्य अशा बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील :

परंतु, अध्यक्षाच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष आलटून पालटून बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

(३) परिषदेच्या बैठकीत मांडल्या जाणाऱ्या सर्व प्रश्नांवर बहुमताने निर्णय घेण्यात येईल.

(४) समसमान मते पडतील अशा बाबतीत, परिषदेच्या बैठकीमध्ये अध्यक्षाचे काम चालविणाऱ्या प्राधिकाऱ्यास, दुसरे किंवा निर्णायक मत असेल आणि तो असे मत वापरील.

(५) (अध्यक्ष आणि उपाध्यक्ष धरुन) आठ सदस्य मिळून गणपूर्ती होईल. जेव्हा गणपूर्तीची आवश्यकता असेल परंतु गणपूर्ती होईल इतके सदस्य उपस्थित नसतील तेव्हा, अध्यक्षपदी असलेला प्राधिकारी, अशा गणपूर्तीकरिता तीस मिनिटांहून कमी नाही एवढ्या कालावधीसाठी प्रतीक्षा केल्यानंतर, अशी बैठक पुढील एखाद्या दिवसाच्या कोणत्याही वेळेपर्यंत तहकूब करील आणि अशी वेळ तो परिषदेच्या कार्यालयातील सूचना फलकावर अधिसूचित करील, आणि मूळ बैठकीत गणपूर्ती झाली असती तर, त्या बैठकीत जे कामकाज आणले गेले असते ते कामकाज अशा रीतीने तहकूब करण्यात आलेल्या पुढील बैठकीत आणण्यात येईल आणि असे कामकाज अशा बैठकीत किंवा अशा बैठकीनंतरच्या तहकूब झालेल्या कोणत्याही पुढील बैठकीत निकालात काढण्यात येईल. मग अशा बैठकीत गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असतील इतके सदस्य उपस्थित असोत वा नसोत.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**९.** (१) परिषदेच्या प्रत्येक बैठकीतील चर्चेचे कामकाज गोपनीय समजण्यात येईल ; आणि कोणतीही व्यक्ती, परिषदेने आधी ठराव केलेला असल्याशिवाय अशा कामकाजाचा कोणताही भाग उघड करणार नाही : **बैठकांमधील कामकाज.**

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, परिषदेने स्वीकृत केलेल्या कोणत्याही ठरावातील मजकूर, परिषदेने असा ठरावसुद्धा गोपनीय राखण्यास यावा असा निदेश दिलेला नसेल तर, उघड करण्यास किंवा प्रसिद्ध करण्यास कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंध होतो असे समजण्यात येणार नाही.

(२) परिषदेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ पुढील कारणांमुळे विधिअग्राह्य होणार नाही :—

(क) परिषदेतील कोणतेही रिकामे पद, किंवा तिच्या रचनेतील कोणताही दोष ; किंवा

(ख) परिषदेचा सदस्य म्हणून एखाद्या व्यक्तीच्या निवडीतील किंवा नामनिर्देशनातील कोणताही दोष ; आणि

(ग) प्रकरणाच्या गुणावगुणांवर परिणाम न करणारी अशी, परिषदेच्या कार्यपद्धतीतील कोणतीही अनियमितता.

(३) परिषदेमध्ये कोणतेही पद रिकामे असताना, पदावर असलेल्या सदस्यांना, जणू असे पद रिकामे झाले नाही असे समजून काम चालविता येईल :

परंतु, रिकाम्या पदांची संख्या कोणत्याही वेळी सातपेक्षा अधिक असणार नाही.

**१०.** (१) परिषद, शक्य तितक्या लवकर या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्याकरिता तिला आवश्यक वाटेल अशा सर्वसाधारण किंवा विशेष प्रयोजनांसाठी आणि अशा अवधीसाठी, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आपल्या सदस्यांमधून एक कार्यकारी समिती आणि इतर समित्या स्थापन करील. **कार्यकारी समिती आणि इतर समित्या.**

(२) कार्यकारी समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) परिषदेचा अध्यक्ष ;

(ख) परिषदेचे दोन उपाध्यक्ष ;

(ग) परिषदेच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेले परिषदेचे दोन सदस्य, त्यातील एक व्यवसायोपचारकाचे प्रतिनिधित्व करील व दुसरा भौतिकोपचारकाचे प्रतिनिधित्व करील ;

(घ) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन.

(३) परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हे, कार्यकारी समितीचे, अनुक्रमे सभापती व उप सभापती असतील.

(४) कार्यकारी समितीचा कोणताही सदस्य, परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी समाप्त होईपर्यंत पद धारण करील आणि तो पुन्हा नामनिर्देशित करण्यासाठी पात्र असेल.

(५) कोणत्याही सदस्यास, समितीच्या अध्यक्षाला उद्देशून आपल्या सहीनिशी लिहिलेल्या लेखी अर्जाद्वारे समितीच्या आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देता येईल आणि ते पद, कलम ५ च्या पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीनेच भरण्यात येईल.

(६) कार्यकारी समिती, विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**समकक्ष नोंदणी समिती.**

**११.** (१) व्यवसायोपचारविषयक व भौतिकोपचारविषयक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनी दिलेल्या पदव्यांना व पदविकांना मान्यता देण्याची शिफारस करण्याच्या प्रयोजनासाठी आणि अनुक्रमे व्यवसायोपचारकांची व भौतिकोपचारकांची नोंदणी करण्यासंबंधीच्या प्रकरणांचा विचार करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्या असतील. या समितींच्या शिफारशी, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली नसेल तर, कार्यकारी समितीच्या व परिषदेच्या मान्यतेच्या अधीन असतील.

(२) संबंधित विषयाचा उपाध्यक्ष हा अशा प्रत्येक समितीचा सभापती असेल. परिषदेच्या अध्यक्षाने, परिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले, यथास्थिति, व्यवसायोपचाराच्या किंवा भौतिकोपचाराच्या विविध शाखांमधील शिक्षणतज्ज्ञ व विशेषज्ञ यांचे प्रतिनिधित्व करणारे असे इतर सदस्य असतील.

**परिषदेच्या कार्यकारी समितीच्या आणि समकक्ष व नोंदणी समितीच्या सदस्यांना द्यावयाची फी व भत्ते.**

**१२.** परिषदेच्या अध्यक्षास व उपाध्यक्षास आणि इतर सदस्यांना आणि तिच्या कार्यकारी समितीच्या आणि समकक्ष व नोंदणी समितीच्या सदस्यांना, बैठकीस हजर राहण्यासाठी, वेळोवेळी विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते देण्यात येतील.

**परिषदेचे उत्पन्न व खर्च.**

**१३.** (१) परिषदेच्या उत्पन्नात पुढील बाबी समाविष्ट असतील :—

(क) व्यवसायींकडून मिळालेली फी ;

(ख) राज्य शासनाकडून कोणतीही अनुदाने मिळाली असल्यास ती अनुदाने ; आणि

(ग) परिषदेस मिळालेल्या इतर कोणत्याही रकमा.

(२) परिषद, पुढील प्रयोजनांसाठी खर्च करण्यास सक्षम असेल :—

(क) परिषदेच्या प्रबंधकाचे व कर्मचारीवर्गाचे वेतन व भत्ते ;

(ख) परिषदेच्या आणि कार्यकारी समितीच्या सदस्यांना द्यावयाची फी व भत्ते ;

(ग) न्यायसहायकास द्यावयाचे पारिश्रमिक ; आणि

(घ) या अधिनियमाखालील कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे इतर खर्च.

**परिषदेच्या प्रबंधकाची नेमणूक, त्याची कर्तव्ये व कामे.**

**१४.** (१) परिषद, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या प्रबंधकाची नेमणूक करील.

(२) कार्यकारी समितीस वेळोवेळी प्रबंधकाला रजा मंजूर करता येईल :

परंतु, जर रजेचा कालावधी एक महिन्यापेक्षा आधिक नसेल तर, अध्यक्षास रजा मंजूर करता येईल.

(३) रजेवर गेल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रबंधकाचे पद तात्पुरते रिकामे झाले असता, उप प्रबंधक हा प्रबंधक म्हणून काम करील. प्रबंधक आणि उप प्रबंधक उपलब्ध नसल्यास, कार्यकारी समितीस, शासनाच्या पूर्वमंजुरीने, त्याच्या जागी काम करण्यासाठी म्हणून इतर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि याप्रमाणे नेमण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ही, अशा नेमणुकीच्या कालावधीत, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता प्रबंधक असल्याचे समजण्यात येईल :

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



परंतु, अशा रीतीने पद रिकामे असण्याचा कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक नसेल तेव्हा,अशी नेमणूक अध्यक्षास करता येईल व तो अशी नेमणूक केल्याचे कार्यकारी समितीस आणि शासनास ताबडतोब कळवील.

(४) परिषदेस, शासनाच्या पूर्वमंजुरीने, प्रबंधक म्हणून नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस पदावरुन निलंबित करता येईल. बडतर्फ करता येईल किंवा काढून टाकता येईल किंवा त्याच्यावर इतर कोणतीही शास्ती लादता येईल ;

परंतु, या पोटकलमाखाली कोणताही आदेश देण्यापूर्वी परिषद, प्रबंधकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(५) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करुन, प्रबंधकाचे वेतन व भत्ते आणि त्याच्या सेवेच्या इतर शर्ती या, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(६) प्रबंधक हा, परिषदेचा पदसिद्ध-सचिव आणि कार्यकारी अधिकारी असेल, तो परिषदेच्या आणि तिच्या कार्यकारी समितीच्या आणि समकक्ष व नोंदणी समितीच्या सर्व बैठकींना उपस्थित राहील आणि तो अशा बैठकीचे कार्यवृत्त, बैठकींना उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे व अशा बैठकीतील कामकाज यांची नोंद ठेवील.

(७) प्रबंधक, विहित केलेल्या रीतीने परिषदेचे लेखे ठेवील.

(८) प्रबंधकास कर्मचारीवर्गावर, विहित करण्यात येतील असे पर्यवेक्षकीय अधिकार असतील, आणि तो, या अधिनियमात विनिर्दिष्ट करण्यात येतील किंवा विहित करण्यात येतील, अशी इतर कर्तव्ये व कामे पार पाडू शकेल.

**१८६० चा ४५.** (९) या कलमान्वये नेमण्यात आलेला प्रबंधक हा, भारतीय दंड संहितेच्या, कलम २१ व्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**परिषदेचे इतर कर्मचारी.**

**१५.** (१) परिषदेस, या अधिनियमाखालील तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा, प्रबंधकाव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल :

परंतु, अशा अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची संख्या व पदनामे आणि त्यांचे वेतन व भत्ते हे, परिषदेकडून, शासनाच्या पूर्वमंजुरीने, निर्धारित करण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, याबाबतीत परिषद घालून देईल त्या वित्तीय मर्यादेस अधीन राहून, कार्यकारी समिती ही, तात्पुरते वाढलेले काम किंवा हंगामी स्वरुपाचे कोणतेही काम पार पाडण्यासाठी लिपिकांची किंवा कर्मचाऱ्यांची तात्पुरती पदे, विहित करण्यात येईल अशा मुदतीकरिता निर्माण करण्यास आणि त्यावर नेमणुका करण्यास सक्षम असेल.

(३) परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर शर्ती या, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**१८६० चा ४५.** (४) या अधिनियमान्वये नेमण्यात आलेले परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या, कलम २१च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## प्रकरण तीन

## परिषदेची कार्ये

**परिषदेचे अधिकार, कर्तव्ये आणि कामे.**

**१६.** या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून, परिषदेचे अधिकार, कर्तव्ये आणि कामे ही पुढीलप्रमाणे असतील :—

(क) सर्व स्तरांवर व्यवसायोपचार व भौतिकोपचार शिक्षणाच्या दर्जाचे निर्धारण व समन्वयन करणे ;

(ख) कलम १७ अन्वये नवीन संस्था उघडण्यासाठी किंवा नवीन पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण सुरु करण्यासाठी परवानगी देण्याविषयी शासनाकडे शिफारस करणे ;

(ग) नोंदवही ठेवणे, आणि राज्यात व्यवसायोपचारकांच्या व भौतिकोपचारकांच्या नोंदणीसाठी तरतूद करणे ;

(घ) व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार व्यवसायींच्या, व्यवसायविषयक वर्तणुकीचे विनियमन करण्यासाठी नीति-संहिता विहित करणे ;

(ङ) व्यवसायोपचार व भौतिकोपचार क्षेत्रातील मनुष्यबळाचा आवश्यकतेसंबंधीच्या प्रकरणी शासनाला सल्ला देणे ;

(च) प्रबंधकाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुध्द केलेल्या अपिलांची सुनावणी करणे व त्यांवर निर्णय देणे ;

(छ) व्यवसायीला समज देणे किंवा नोंदवहीतून त्याचे नाव निलंबित करणे किंवा काढून टाकणे किंवा परिषदेच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशी इतर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(ज) परिषदेच्या सदस्यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी किंवा कोणत्याही परिस्थितीत असा पदावधी समाप्त झाल्याच्या दिनांकानंतर सहा महिन्यांच्या कालावधीत निवडणुका घेणे ; आणि

(झ) या अधिनियमात ठरवून देण्यात आलेल्या किंवा विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही अधिकाराचा वापर करणे, अशी इतर कोणतीही कर्तव्ये पार पाडणे आणि अशी इतर कोणतीही कामे करणे.

**नवीन संस्था स्थापन करणे, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, इत्यादींसाठी परवानगी.**

**१७.** (१) या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा दिनांकापासून या कलमांच्या तरतुदींनुसार राज्य शासनाची पूर्व परवानगी मिळविल्याशिवाय, —

(क) कोणतीही व्यक्ती, संस्था स्थापन करणार नाही ; किंवा

(ख) कोणतीही संस्था, —

(एक) कोणत्याही मान्यताप्राप्त व्यवसायोपचारविषयक किंवा भौतिकोपचारविषयक अर्हता प्राप्त करण्यासाठी, विद्यार्थ्यांना अर्ह करण्यास जो पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण त्यांना सहाय्यभूत ठरेल असा नवीन किंवा उच्च अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण (पदव्युत्तर अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण यासह) सुरु करणार नाही ; किंवा

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(दोन) कोणत्याही अभ्यास पाठ्यक्रमामधील किंवा प्रशिक्षणामधील (पदव्युत्तर अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण यासह) प्रवेश क्षमतेमध्ये वाढ करणार नाही.

**स्पष्टीकरण १.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी, "व्यक्ती" यामध्ये कोणतेही विद्यापीठ किंवा विश्‍वस्त मंडळ किंवा सोसायटी किंवा संस्था यांचा समावेश होईल. परंतु, केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांचा समावेश होणार नाही.

**स्पष्टीकरण २.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी, "प्रवेश क्षमता" याचा एखाद्या संस्थेतील कोणत्याही अभ्यास पाठ्यक्रमाच्या किंवा प्रशिक्षणाच्या (पदव्युत्तर अभ्यास पाठ्यपुस्तक किंवा प्रशिक्षण यासह) बाबतीतील अर्थ, असा पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण यासाठी प्रवेश देण्याकरिता, शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी विद्यार्थ्यांची कमाल संख्या, असा आहे ;

(२) (क) पोट-कलम (१) अन्वये परवानगी मिळवण्याच्या प्रयोजनासाठी, प्रत्येक व्यक्ती किंवा संस्था, राज्य शासनाकडे योजना सादर करील ;

(ख) असा अर्ज मिळाल्यावर राज्य शासन ती योजना परिषदेकडे तिच्या शिफारशींसाठी पाठवील.

(३) पोट-कलम (२) अन्वये परिषदेला योजना मिळाल्यावर, परिषद, संबंधित व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून, तिला आवश्यक वाटेल, असा इतर तपशील मिळवू शकेल आणि त्यानंतर, ती परिषद, —

(क) ती योजना जर सदोष असेल आणि एखाद्या आवश्यक तपशिलाचा त्यात अंतर्भाव नसेल तर, संबंधित व्यक्तीला किंवा संस्थेला लेखी निवेदन देण्याची वाजवी संधी देऊ शकेल आणि परिषदेकडून विनिर्दिष्ट केलेले दोष, कोणतेही असल्यास, दुरूस्त करण्याची अशा व्यक्तीला किंवा संस्थेला मुभा असेल ;

(ख) पोट-कलम (५) मध्ये निर्देशिलेले घटक लक्षात घेऊन, योजनेचा विचार करु शकेल आणि ती योजना, त्यावरील तिच्या शिफारशींसह राज्य शासनास सादर करु शकेल ;

(४) राज्य शासन, ती योजना व पोट-कलम (३) खालील परिषदेच्या शिफारशी यांवर विचार केल्यानंतर आणि, संबंधित व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून, जेथे आवश्यक असेल तेथे, त्यास आवश्यक वाटेल असा इतर तपशील मिळविल्यानंतर, आणि पोट-कलम (५) मध्ये निर्देशिलेले घटक लक्षात घेऊन, योजनेस (त्यास आवश्यक वाटतील अशा शर्तीसह, कोणत्याही असल्यास) मान्यता देऊ शकेल. अशी मान्यता ही, पोट-कलम (१) अन्वये परवानगी दिली असल्याचे मानण्यात येईल.

योजना अमान्य झाल्यास, अशा अमान्यतेची कारणे लेखी नोंदविण्यात येतील आणि अशा कारणांसह असा निर्णय अर्जदारास कळविण्यात येईल :

परंतु, अर्जदारास शासनाने उपस्थित केलेल्या आक्षेपांबाबतच्या स्पष्टीकरणांसह शासनाकडे अभिवेदन करता येईल आणि शासनास, अशा स्पष्टीकरणांवर विचार केल्यानंतर परवानगी देता येईल :

परंतु आणखी असे की, या पोट-कलमामधील कोणत्याही गोष्टीमुळे, जिच्या योजनेस राज्य शासनाकडून मान्यता मिळाली नाही अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस, पुन्हा नवीन योजना सादर करण्यासाठी प्रतिबंध होणार नाही आणि या कलमाच्या तरतुदी, जणू काही अशी योजना पोट-कलम (२) अन्वये प्रथमच सादर केली असल्याप्रमाणे, त्या योजनेस लागू होतील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(५) परिषद पोट-कलम (३) च्या खंड (ख) खाली तिच्या शिफारशी करतेवेळी, आणि राज्य शासन, पोट-कलम (४) अन्वये योजनेस एकतर मंजुरीचा किंवा नामंजुरीचा आदेश देतेवेळी, पुढील बाबी लक्षात घेईल :—

(क) नवीन किंवा उच्च अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण सुरु करण्याचा हेतू असणारी प्रस्तावित संस्था किंवा विद्यमान संस्था, कलम १६ अन्वये परिषदेकडून विहित करण्यात आल्याप्रमाणे, शिक्षणाचा किमान दर्जा देऊ करण्याच्या स्थितीमध्ये आहे किंवा कसे ;

(ख) संस्था स्थापन करण्याचा हेतू असलेल्या व्यक्तीकडे किंवा नवीन किंवा उच्च अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण सुरु करण्याचा किंवा प्रवेश क्षमता वाढविण्याचा हेतू असलेल्या विद्यमान संस्थेकडे पुरेशी वित्तीय साधनसंपत्ती आहे किंवा कसे ;

(ग) संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे यासाठी किंवा नवीन अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी किंवा वाढीव प्रवेश क्षमता सामावून घेण्यासाठी कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, जागा, प्रशिक्षण याबाबतीतील आवश्यक सुविधा आणि इतर सुविधा, योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत पुरविण्यात आल्या आहेत किंवा पुरविण्यात येतील किंवा कसे ;

(घ) अशा संस्थेत किंवा अभ्यास पाठ्यक्रमास किंवा प्रशिक्षणास उपस्थित राहणाऱ्या संभाव्य विद्यार्थ्यांना मान्यताप्राप्त व्यवसायोपचारविषयक किंवा, यथास्थिति भौतिकोपचारविषयक, अर्हता असणाऱ्या व्यक्तींकडून प्रशिक्षण देण्यासाठी काही व्यवस्था केली आहे किंवा कार्यक्रम आखला आहे किंवा कसे ;

(ङ) व्यवसायोपचाराच्या किंवा यथास्थिति, भौतिकोपचाराच्या व्यवसायाच्या क्षेत्रातील मनुष्यबळाची गरज भागविण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली आहे किंवा कार्यक्रम आखला आहे किंवा कसे ; आणि

(च) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

(६) या कलमाखाली, राज्य शासन योजनेस मंजुरीचे किंवा नामंजुरीचे आदेश संमत करील तेव्हा, त्या आदेशाची एक प्रत संबंधित व्यक्तीस किंवा संस्थेस पाठवण्यात येईल.

(७) राज्य शासनाने योजनेस मंजुरी दिल्यानंतर, संस्थेचे नाव अनुसूची-एक मध्ये, किंवा यथास्थिति, अनुसूची-दोन मध्ये समाविष्ट करण्यात येईल.

**विवक्षित प्रकरणांत अर्हतेस मान्यता न देणे.**

**१८.** (१) हा अधिनियम अंमलात आल्यानंतर, कलम १७ च्या तरतुदीनुसार राज्य शासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय जेव्हा कोणतीही संस्था स्थापन करण्यात आली असेल तेव्हा, अशा संस्थेच्या कोणत्याही विद्यार्थ्याला दिलेली कोणतीही व्यवसायोपचारविषयक किंवा भौतिकोपचारविषयक अर्हता ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मान्यताप्राप्त अर्हता असणार नाही.

(२) कलम १७ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय जेव्हा, कोणत्याही संस्थेने नवीन किंवा उच्च अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण (पदव्युत्तर अभ्यास पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण यांसह) सुरु केले असेल तेव्हा, अशा अभ्यास पाठ्यक्रमाच्या किंवा प्रशिक्षणाच्या आधारावर अशा संस्थेच्या कोणत्याही विद्यार्थ्याला दिलेली अर्हता ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त अर्हता असणार नाही.

(३) कलम १७ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय जेव्हा कोणत्याही संस्थेने कोणत्याही अभ्यास पाठ्यक्रमाच्या किंवा प्रशिक्षणाच्या तिच्या प्रवेश क्षमतेत वाढ केली असेल, तेव्हा त्या वाढीव प्रवेश क्षमतेच्या आधारावर अशा संस्थेच्या कोणत्याही विद्यार्थ्याला दिलेली व्यवसायोपचारविषयक

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



किंवा भौतिकोपचारविषयक अर्हता ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मान्यताप्राप्त व्यवसायोपचारविषयक किंवा भौतिकोपचारविषयक अर्हता असणार नाही.

**स्पष्टीकरण —** या कलमाच्या प्रयोजनार्थ, अशा अनधिकृत वाढीव प्रवेश क्षमतेच्या आधारावर व्यवसायोपचारविषयक किंवा भौतिकोपचारविषयक अर्हता दिलेला विद्यार्थी ओळखण्याचे निकष विहित केल्याप्रमाणे असतील.

**विवक्षित विद्यमान संस्थांसाठी परवानगी मागण्याचा कालावधी.**

**१९.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही व्यक्तीने एखादी संस्था स्थापन केली असल्यास अशी व्यक्ती, उक्त दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत कलम १७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाची परवानगी मिळण्याची मागणी करील.

(२) अशा कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये परवानगी मागण्यात कसूर केल्यास, शक्य असेल तेथवर, जणू काही कलम १७ अन्वये राज्य शासनाची परवानगी नाकारण्यात आलेली आहे असे मानून कलम १८ च्या तरतुदी लागू होतील.

**व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार व्यावसायिकांसाठी [1][भारतातील किंवा विदेशातील] विद्यापीठे, इत्यादींनी दिलेल्या अर्हतांची मान्यता.**

**२०.** (१) [1][भारतातील किंवा विदेशातील] जे कोणतेही विद्यापीठ किंवा अन्य संस्था व्यवसायोपचारातील किंवा भौतिकोपचारातील अर्हता देत असेल आणि ज्या विद्यापीठाच्या, किंवा यथास्थिति, संस्थेच्या नावाचा अनुसूच्यांमध्ये समावेश नसेल त्यांना, कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे अनुसूच्यांमध्ये आपल्या नावाचा समावेश करण्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल आणि राज्य शासनास, परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, संबद्ध अनुसूचीमध्ये त्या विद्यापीठाचे किंवा संस्थेचे नाव समाविष्ट करता यावे म्हणून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि अशा कोणत्याही अधिसूचनेत असाही निदेश देता येईल की, संबद्ध अनुसूचीच्या शेवटच्या स्तंभामध्ये अशा विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या नावासमोर, विनिर्दिष्ट दिनांकानंतरच फक्त, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, ते मान्यताप्राप्त विद्यापीठ, किंवा यथास्थिति, संस्था असेल हे घोषित करणारी नोंद करण्यात येईल.

(२) व्यवसायोपचाराशी संबंधित अनुसूची-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा भौतिकोपचाराशी संबंधित अनुसूची-दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या [1][भारतातील किंवा विदेशातील] कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर संस्थेकडून देण्यात आलेल्या अर्हता ह्या, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता व्यवसायोपचारक व भौतिकोपचारक यांच्यासाठी मान्यताप्राप्त अर्हता असतील.

**मान्यतेचा प्रभाव.**

**२१.** (१) (क) अनुसूची-एक मध्ये आणि अनुसूची-दोन मध्ये समाविष्ट केलेल्या विद्यापीठाने किंवा संस्थेने दिलेली अनुक्रमे व्यवसायोपचारविषयक किंवा भौतिकोपचारविषयक कोणतीही अर्हता ही, व्यवसायोपचारकांच्या किंवा यथास्थिति, भौतिकोपचारकांच्या नोंदवहीत नाव नोंदवण्यासाठी पुरेशी अर्हता असेल.

(ख) कोणत्याही व्यक्तीने मान्यताप्राप्त अर्हता धारण केली असल्याखेरीज, ती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, व्यवसायोपचारक किंवा भौतिकोपचारक म्हणून नोंदवहीत नाव नोंदविण्यास हक्कदार असणार नाही :

परंतु, एखादी व्यक्ती नाव नोंदवण्यास हक्कदार आहे किंवा कसे याविषयी कोणताही विवाद असेल त्याबाबतीत, असे प्रकरण संबंधित समकक्षता व नोंदणी समितीकडे निर्देशित करण्यात येईल. ती समिती त्यावर विचार करील आणि कार्यकारी समितीला शिफारशी करील. कार्यकारी समितीचा याबाबतचा निर्णय अंतिम असेल.

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ४ द्वारे 'भारतातील' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) कोणत्याही परकीय देशात कोणत्याही व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार परिषदेकडे त्याला नोंदणी करण्याचा हक्क प्राप्त करुन देणारी, त्या देशाच्या सरकारकडून मान्यताप्राप्त झालेली अशी अर्हता धारण करणाऱ्या भारताच्या कोणत्याही नागरिकाचे नाव परिषदेच्या मान्यतेने, यथास्थिति, व्यवसायोपचारक किंवा भौतिकोपचारक म्हणून, उक्त अर्हतेचा समावेश संबंधित अनुसूचीमध्ये होईपर्यंत नोंदवहीत तात्पुरते नोंदवता येईल.

(ख) भारतातील कोणत्याही रुग्णालयात किंवा संस्थेमध्ये व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार अध्यापक म्हणून कामावर ठेवलेली आहे अशा, भारताच्या नागरिक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीचे नाव, जेव्हा अशा रुग्णालयास किंवा संस्थेस, अध्यापनाच्या, संशोधनाच्या किंवा धर्मादाय कार्याच्या प्रयोजनासाठी संबंधित राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या शासनाकडून मान्यता मिळालेली असेल तेव्हा, परिषदेच्या अध्यक्षाची मान्यता घेऊन, त्या अध्यक्षाने दिलेल्या आदेशात त्याबाबत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी, नोंदवहीत तात्पुरते नोंदवता येईल :

परंतु, अशा व्यक्तीस सर्वसाधारण व्यवसायोपचाराचा किंवा भौतिकोपचाराचा व्यवसाय करण्यासाठी परवानगी मिळणार नाही आणि असे अध्यापन किंवा कार्य हे ती ज्याच्याशी संलग्न आहे असे रुग्णालय किंवा संस्था यापुरतेच मर्यादित असेल :

परंतु आणखी असे की, चाळणी चाचणी किंवा विहित करण्यात येईल अशी इतर चाचणी किंवा परीक्षा घेऊन त्याद्वारे अशा व्यक्तीकडे व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार व्यवसायाचे आवश्यक ते ज्ञान व कौशल्य आहे याबाबत परिषदेची स्वतःची खात्री पटल्याखेरीज खंड (क) खालील अशा नावनोंदणीस परवानगी दिली जाणार नाही.

**अभ्यास पाठ्यक्रम व प्रशिक्षण आणि परीक्षा याविषयीची माहिती मागवण्याचा अधिकार.**

**२२.** कोणतीही मान्यताप्राप्त अर्हता किंवा मान्यताप्राप्त उच्च अर्हता देणारे महाराष्ट्रातील प्रत्येक प्राधिकरण किंवा संस्था किंवा विद्यापीठ, अशी अर्हता प्राप्त करण्यासाठी पूर्ण करावयाचा अभ्यास पाठ्यक्रम व प्रशिक्षण आणि परीक्षा याविषयी, आणि अशी अर्हता प्राप्त करण्यासाठीच्या सर्वसाधारण आवश्यकता याविषयी, परिषद वेळोवेळी फर्मावील, असा तपशील आणि अशी माहिती पुरवील.

**निरीक्षक.**

**२३.** (१) कार्यकारी समितीला, यासंदर्भात तयार केलेल्या विनियमांच्या, कोणतेही असल्यास, अधीन राहून जेथे व्यवसायोपचाराचे किंवा भौतिकोपचाराचे शिक्षण किंवा प्रशिक्षण देण्यात येते अशा कोणत्याही संस्थेचे निरीक्षण करण्यासाठी, आणि कोणतीही मान्यताप्राप्त अर्हता किंवा मान्यताप्राप्त उच्च अर्हता देण्याच्या प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षांना उपस्थित राहण्यासाठी, तिला आवश्यक वाटेल इतक्या संख्येत निरीक्षक नियुक्त करता येतील.

(२) या कलमान्वये नियुक्त करण्यात आलेले निरीक्षक, कोणत्याही परीक्षेच्या कामकाजात हस्तक्षेप करणार नाहीत. परंतु प्रशिक्षण देण्याच्या प्रयोजनासाठी संस्थेच्या योग्यतेबाबत आणि त्यात देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या पर्याप्ततेबाबत किंवा, यथास्थिति, परीक्षेच्या दर्जाच्या पर्याप्ततेबाबत आणि कार्यकारी समिती त्यांना अहवाल देण्यास फर्मावील अशा कोणत्याही इतर बाबींसंबंधात ते कार्यकारी समितीला आपला अहवाल देतील.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(३) कार्यकारी समिती, संबंधित समकक्षता व नोंदणी समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, अशा अहवालाची एक प्रत, संबंधित प्राधिकरणाला किंवा संस्थेला पाठवील आणि ती, संबंधित प्राधिकरणाचे किंवा संस्थेचे त्यावरील, कोणतेही अभिप्राय असल्यास, त्या अभिप्रायांसह अशा अहवालाच्या प्रती राज्य शासनाकडे व परिषदेकडेही पाठवील.

**मान्यता काढून घेणे.**

**२४.** (१) कार्यकारी समितीच्या अहवालावरुन,—

(क) राज्यातील कोणत्याही विद्यापीठातून किंवा संस्थेतून मान्यताप्राप्त अर्हता मिळविण्यासाठी घ्यावे लागणारे अभ्यास पाठ्यक्रम, प्रशिक्षण व परीक्षा किंवा अशा पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या शर्ती किंवा अशा परीक्षांमध्ये उमेदवारांकडून आवश्यक असणारा प्राविण्याचा दर्जा ;

(ख) अशा विद्यापीठात किंवा संस्थेत पुरविण्यात आलेला कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, सोयी, प्रशिक्षण व इतर सुविधा ;

या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या विनियमांशी सुसंगत नाहीत किंवा परिषदेने विहित केलेल्या दर्जापेक्षा कमी आहेत असे परिषदेला दिसून आले असेल तर, परिषद, राज्य शासनाला तशा आशयाचे अभिवेदन करील. राज्य शासन, असे अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल अशा अभिप्रायांसह ते, संबंधित विद्यापीठाला किंवा संस्थेला, त्यांचे स्पष्टीकरण राज्य शासनाला त्या विद्यापीठाकडून किंवा संस्थेकडून ज्या कालावधीत सादर करता येईल, अशा कालावधीच्या सूचनेसह पाठवील.

(२) स्पष्टीकरण प्राप्त झाल्यावर किंवा, नियत कालावधीत स्पष्टीकरण सादर केलेले नसल्यास, असा कालावधी समाप्त झाल्यानंतर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, कोणतीही असल्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, यथास्थिति, पहिल्या किंवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये उक्त विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या नावासमोर आणि त्यांनी प्रदान केलेल्या अर्हतांसमोर, अशी उक्त विद्यापीठाने किंवा संस्थेने प्रदान केलेली अर्हता ही, विनिर्दिष्ट तारखेपूर्वी देण्यात आलेली असेल तेव्हाच फक्त ती मान्यताप्राप्त अर्हता असेल असे घोषित करणारी नोंद करण्यात यावी.

**व्यावसायिक वर्तणूक.**

**२५.** (१) परिषदेस राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, विनियमांद्वारे, व्यवसायोपचारकांसाठी व भौतिकोपचारकांसाठी व्यावसायिक वर्तणुकीची व शिष्टाचारांची मानके आणि नीति-संहिता विहित करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या विनियमांमध्ये, त्या विनियमांचा कोणत्या प्रकारचा भंग हा व्यावसायिक गैरवर्तणूक ठरेल ते विनिर्दिष्ट करता येईल आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी तरतूद प्रभावी असेल.

(३) कार्यकारी समिती, तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, ज्या ज्या वेळी, व्यवसायोपचारक नोंदवहीमध्ये किंवा भौतिकोपचारक नोंदवहीमध्ये दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचे नाव व्यावसायिक गैरवर्तणुकीबद्दल, अशा नोंदवहीतून काढून टाकण्यात यावे, अशी शिफारस करील, त्या त्या वेळी ती परिषदेस तसे कळवील आणि परिषद, तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आदेशाद्वारे, अशा व्यक्तीचे नाव उक्त नोंदवहीतून एकतर कायमचे किंवा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी काढून टाकण्याचा निदेश देईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(४) परिषदेच्या या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, अशा कालावधीत, अशा शर्तींवर व अशा शुल्काचे प्रदान केल्यावर, अशा आदेशाविरुध्द राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल.

(५) असे अपील प्राप्त झाल्यावर, राज्य शासनास, संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, यथोचित आदेश काढता येईल आणि असा आदेश अंतिम व बंधनकारक असतील.

**२६.** परिषद, राज्य शासनाकडून ज्या ज्या वेळी मागविण्यात येईल त्या त्या वेळी, तिच्या कार्यवृत्ताच्या प्रती, अहवाल, तिच्या लेख्याची विवरणे आणि इतर माहिती पुरवील. **पुरवावयाची माहिती.**

---

## प्रकरण चार

## नोंदवही तयार करणे व ठेवणे

**२७.** (१) नेमलेल्या दिनांकानंतर शक्य तितक्या लवकर, प्रबंधक या अधिनियमाच्या तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्यातील व्यवसायोपचारक व भौतिकोपचारक याची एक नोंदवही तयार करील व ती ठेवील. **नोंदवही तयार करणे.**

(२) ही नोंदवही विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल, आणि विहित करण्यात येईल इतक्या भागांमध्ये तिची विभागणी करता येईल. नोंदवहीमध्ये, नोंदणी करण्यात आलेल्या व्यवसायोपचारकाचे व भौतिकोपचारकाचे पूर्ण नाव, पत्ता, जन्मतारीख आणि अर्हता, ज्या तारखेस त्याने प्रत्येक अर्हता प्राप्त केली असेल ती तारीख आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील, यांचा अंतर्भाव असेल.

(३) अनुसूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थांमधून अर्हता धारण करणाऱ्या आणि व्यवसायोपचारक व भौतिकोपचारक म्हणून आपला व्यवसाय चालू ठेवण्यासाठी इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित नमुन्यात प्रबंधकाकडे अर्ज केल्यावर आणि परिषदेस एक हजार रुपये इतकी फी प्रदान केल्यावर आणि त्याची पदवी, पदविका, लायसन किंवा प्रमाणपत्र सादर केल्यावर, नोंदवहीमध्ये तिचे नाव नोंदवण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी नोंदवहीमध्ये आपल्या नावाची नोंद ठेवण्याचा हक्क असेल.

(४) प्रत्येक नोंदणीकृत व्यवसायी, विहित नमुन्यात प्रबंधकाकडे अर्ज केल्यावर आणि परिषदेस पाचशे रुपये इतकी फी प्रदान केल्यावर, त्यास नोंदणी दिल्याच्या किंवा यथास्थिति, नोंदणीचे नूतनीकरण केल्याच्या दिनांकापासून आणखी पाच वर्षे इतक्या कालावधीसाठी आपल्या नोंदणीचे नूतनीकरण करुन घेण्यास हक्कदार असेल :

परंतु, नूतनीकरणाचा प्रत्येक अर्ज, नोंदणी समाप्त होण्याच्या किमान तीन महिने अगोदर करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, नोंदणी समाप्त झाल्याच्या दिनांकानंतर एक महिन्याच्या कालावधीच्या आत, नोंदणीचे नूतनीकरण करण्यासाठी केलेल्या अर्जाबाबत दोनशे रुपयांची अतिरिक्त विलंब फी आकारल्यानंतर नूतनीकरण करता येईल. नोंदणी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीनंतर नोंदणीचे नूतनीकरण करण्यासाठी प्राप्त झालेला अर्ज हा, पोट-कलम (३) खालील नवीन अर्ज असल्याचे समजण्यात येईल.

(५) प्रत्येक नोंदणीकृत व्यवसायीला विहित नमुन्यात नोंदणीचे किंवा नोंदणीच्या नूतनीकरणाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. नोंदणीकृत व्यवसायी, नोंदणीचे किंवा नोंदणीच्या नूतनीकरणाचे प्रमाणपत्र,

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



त्याच्या दवाखान्यात, चिकित्सालयात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी, आणि जर त्याची एकापेक्षा अधिक ठिकाणे असतील तर त्यापैकी कोणत्याही एका ठिकाणी, ठळक जागी लावील.

(६) नोंदणीचे किंवा नोंदणीच्या नूतनीकरणाचे प्रमाणपत्र विरुप झाले आहे, हरवलेले आहे किंवा नष्ट झालेले आहे असे, प्रबंधकाची खात्री पटेल अशाप्रकारे दाखवून दिल्यास, पाचशे रुपये प्रदान केल्यावर, प्रबंधक विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, प्रमाणपत्राची दुसरी प्रत देऊ शकेल.

**नोंदवहीतून नावे काढून टाकणे.**

**२८.** (१) परिषदेने किंवा कार्यकारी समितीने, विहित रीतीने केलेल्या योग्य चौकशीअंती, कोणताही नोंदणीकृत व्यवसायी कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आढळून आले तर, परिषदेस,—

(क) अशा व्यवसायीस ताकीद देणारे पत्र पाठविता येईल, किंवा

(ख) अशा व्यवसायीचे नाव,—

(एक) निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी नोंदवहीतून काढून टाकण्याविषयी ; किंवा

(दोन) नोंदवहीतून कायमचे काढून टाकण्याविषयी,—

निदेश देता येईल.

**स्पष्टीकरण,**— या कलमाच्या प्रयोजनासाठी "गैरवर्तणूक" याचा अर्थ,—

(एक) ज्यात नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव होतो अशा कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या फौजदारी न्यायालयाकडून करण्यात येणारी एखाद्या नोंदणीकृत व्यवसायीची अपराधसिद्धी ; किंवा

(दोन) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या अर्थांतर्गत दखलपात्र असलेल्या अपराधाबद्दल **१९७४ चा २.** लष्करी कायद्याच्या अधीनतेने नोंदणीकृत व्यवसायीची, सेना अधिनियम, १९५० खालील अपराधसिद्धी ; **१९५० चा ४६.** किंवा

(तीन) वैद्यकीय पेशाच्या संदर्भात, विशेषत: या अधिनियमाअन्वये स्थापन करण्यात आलेल्या परिषदेने त्या संबंधात विहित केलेल्या कोणत्याही नीति-संहितेअनुसार परिषदेच्या मते अतिनिंद्य असेल अशी कोणतीही वर्तणूक,

असा आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही चौकशी करताना परिषदेला, किंवा यथास्थिति, कार्यकारी **१९०८ चा ५.** समितीला पुढील बाबींसंबंधात न्यायचौकशी करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतील, तेच अधिकार असतील :—

(क) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवज हजर करण्याची सक्ती करणे ; आणि

(ग) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे पाठविणे.

(३) या कलमाखालील सर्व चौकशी ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या **१८६० चा ४५.** अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(४) (क) या कलमाखालील कोणत्याही चौकशीमध्ये उद्‌भवणाऱ्या कोणत्याही कायदेविषयक प्रश्नाबाबत परिषदेला, किंवा यथास्थिति, कार्यकारी समितीला सल्ला देण्यासाठी, जो किमान दहा वर्षे,—

१९६१ चा २५. (एक) अधिवक्ता अधिनियम, १९६१ खाली नावनोंदणी केलेला अधिवक्ता म्हणून ; किंवा

(दोन) उच्च न्यायालयाचा न्यायवादी म्हणून ;

राहिला असेल अशा न्यायसहायकाची नेमणूक करता येईल.

(ख) या पोट-कलमाखालील कोणत्याही न्यायसहायकाची नेमणूक एकतर सर्वसाधारण चौकशींसाठी किंवा कोणत्याही विशिष्ट चौकशीसाठी किंवा चौकशींच्या वर्गासाठी करण्यात येईल व त्यास विहित केलेले पारिश्रमिक देण्यात येईल.

**नोंदवहीतून नावे काढून टाकण्याच्या आदेशाविरुध्द अपील.**

**२९.** (१) व्यावसायिक गैरवर्तणुकीच्या कारणावरुन किंवा [१][* * * *] इतर कोणत्याही कारणावरुन, कोणत्याही व्यक्तीचे नाव नोंदवहीतून काढून टाकले असता [२][किंवा सूचीत नाव दाखल करण्यासाठी कलम ३०क च्या पोट-कलम (२) खाली केलेला त्याचा अर्ज फेटाळण्यात आला म्हणून] त्या व्यक्तीला राज्य शासनाकडे विहित फीसह विहित रीतीने अपील करता येईल आणि शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(२) पोट-कलम (१) खालील कोणतेही अपील, जर ते त्या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीनंतर दाखल केले गेले तर, स्वीकृत केले जाणार नाही :

परंतु, उक्त कालावधीत अपील दाखल न करण्यासाठी अर्जदाराकडे पुरेसे कारण होते, अशी त्याने शासनाची खात्री पटविल्यास उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही ते अपील स्वीकृत करण्यात येईल.

**नोंदणीकृत सदस्यांचे अधिकार आणि विशेषाधिकार.**

**३०.** नोंदणीकृत व्यवसायाखेरीज, अन्य कोणतीही व्यक्ती,—

(क) राज्य शासनामधील किंवा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाकडून चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेतील व्यवसायोपचारकाचे किंवा भौतिकोपचारकाचे पद किंवा (कोणत्याही पदनामाने संबोधिले जाणारे), इतर कोणतेही पद धारण करणार नाही ;

(ख) महाराष्ट्र राज्यात कुठेही व्यवसायोपचाराचा किंवा भौतिकोपचाराचा व्यवसाय करणार नाही आणि अशा व्यवसायासंबंधात जो कोणताही खर्च किंवा फी मिळण्यास ती हक्कदार असेल, तो खर्च किंवा फी वसूल करणार नाही ;

(ग) कोणत्याही कायद्याद्वारे व्यवसायोपचारकाने फी, किंवा यथास्थिति, भौतिकोपचारकाने स्वाक्षरित करणे किंवा प्रमाणित करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्यास किंवा ते प्रमाणित करण्यास हक्कदार असणार नाही ;

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२च्या कलम ५ द्वारे "तो आवश्यक असलेली व्यवसायोपचार आणि भौतिकोपचारविषयक अर्हता धारण करीत नाही या कारणाखेरीज" हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



(घ) व्यवसायोपचाराशी, किंवा यथास्थिति, भौतिकोपचाराशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबींवर, भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ अन्वये एक तज्ज्ञ म्हणून, कोणत्याही तपासात किंवा न्यायालयात कोणताही पुरावा देण्यास हक्कदार असणार नाही. **१८७२ चा १.**

**प्रस्थापित व्यवसायींना हाड बसविण्याचा आणि मालिशने उपचार करण्याचा त्यांचा पारंपरिक व्यवसाय चालू ठेवण्यास परवानगी देणे.**

[1][**३० क.** (१) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद (सुधारणा) अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, जी व्यक्ती दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या काळापासून एकाच ठिकाणी, सातत्याने आणि विनाव्यत्यय, रुग्णाला तोंडावाटे किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणतेही औषध न देता, हाड बसविण्याचा आणि स्नायूंचे दुखणे बरे करण्यासाठी मालिशने उपचार करण्याचा आपला पारंपरिक धंदा किंवा व्यवसाय करीत असेल आणि पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे परिषदेच्या सूचीमध्ये जिने आपले नाव दाखल केले असेल अशा व्यक्तीस, त्याच ठिकाणी असा व्यवसाय चालू ठेवता येईल. **२००५ चा महा. ४२.**

(२) (क) पोट-कलम (१) मध्ये घालून दिलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या व आपला पारंपरिक धंदा किंवा व्यवसाय चालू ठेवण्यास इच्छुक असलेल्या पारंपरिक व्यवसायीस, उक्त सुधारणा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, विहित नमुन्यात, एक हजार रुपये फीसह, आणि पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, राज्यातील दिलेल्या पत्त्यावर सातत्याने धंदा किंवा व्यवसाय करीत असल्याचा, विहित केल्याप्रमाणे पुरावा देऊन परिषदेकडे अर्ज करता येईल :

परंतु, उपरोक्त कालावधी समाप्त झाल्यावर सूचीत नाव दाखल करण्याकरिता केलेला कोणताही अर्ज विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही.

(ख) परिषदेस खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत असा अर्ज प्राप्त झाल्यावर, अर्जाची आवश्यक ती पडताळणी करुन आणि अर्जदाराच्या दाव्याच्या खरेपणाविषयी स्वत:ची खात्री करुन घेतल्यानंतर, या अधिनियमाखाली अशा व्यवसायीची सूची तयार करता येईल आणि अशा सूचीदाखल केलेल्या व्यवसायीची यादी **राजपत्रात** प्रसिद्ध करता येईल :

परंतु, परिषदेने ज्या पारंपरिक व्यवसायीचा सूचीमध्ये नाव दाखल करण्यासाठी केलेला अर्ज फेटाळला असेल त्याला, कलम २९ खाली तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल :

परंतु आणखी असे की, अपिलामध्ये अपीलकाराचा दावा अपील प्राधिकरणाद्वारे मान्य करण्यात आला असेल तर, परिषद, अशा व्यवसायीचे नाव सूचीदाखल करील आणि अशी सूची सुधारित करुन, सूचीमध्ये अपीलकाराच्या नावाचा समावेश करील आणि अशी सुधारणा **राजपत्रात** प्रसिद्ध करील.]

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ याच्या कलम ६ द्वारे कलम ३०क समाविष्ट करण्यात आले.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## प्रकरण पाच

## अपराध व शास्ती

**३१.** (१) या अधिनियमाखाली मान्यताप्राप्त किंवा प्राधिकृत असलेल्या संस्थेखेरीज इतर कोणतीही व्यक्ती, कोणतीही पदवी, पदविका, लायसन, प्रमाणपत्र किंवा ज्यात त्यांचे धारक, ग्राही किंवा ग्रहीता, व्यवसायोपचाराचा, किंवा यथास्थिति, भौतिकोपचाराचा व्यवसाय करण्यास अर्ह आहेत असे नमूद केले असेल किंवा अभिप्रेत असेल असा अन्य कोणताही पुरस्कार प्रदान करणार नाही, मंजूर करणार नाही किंवा देणार नाही किंवा असे प्रदान करण्यास, मंजूर करण्यास किंवा देण्यास स्वतःला हक्कदार समजणार नाही. **अनधिकृत व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून पदव्युत्तर पदवी, लायसन, इत्यादी, प्रदान करणे, मंजूर करणे किंवा देणे.**

(२) या अधिनियमाखाली तयार केलेल्या आणि ठेवलेल्या नोंदवहीत ज्यांची नावे दाखल केली आहेत अशा व्यवसायोपचारक किंवा भौतिकोपचारक व्यक्तीखेरीज इतर कोणतीही व्यक्ती, वैद्यक शास्त्र पद्धतीच्या व्यवसायोपचाराचा किंवा भौतिकोपचाराचा व्यवसाय करणार नाही.

**३२.** (१) कलम ३१ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, आणि अशा प्रकारचे उल्लंघन करणारी व्यक्ती ही संस्था असेल तर, त्या संस्थेच्या मालकाने किंवा संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षाने व सदस्यांनी जाणीवपूर्वक किंवा हेतुपुरस्सर असे उल्लंघन प्राधिकृत केले असेल किंवा त्यास परवानगी दिली असेल तर, त्यांना अपराधसिद्धीनंतर,— **कलम ३१ च्या तरतुदींचे उल्लंघन करुन केलेल्या कृतीबद्दल शास्ती.**

(क) पहिल्या अपराधासाठी, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल ;

(ख) दुसऱ्या किंवा त्यापुढील अपराधासाठी, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, अपराधसिद्धीच्या अशा आदेशानंतरही, जर उल्लंघन पुढे चालू राहिले तर, अशा उल्लंघनाच्या पुढील प्रत्येक दिवसासाठी, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढा आणखी दंड लादण्यात येईल.

(२) जी कोणतीही व्यक्ती, कलम ३१ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करुन कृती करील, तिला अपराधसिद्धीनंतर,—

(क) पहिल्या अपराधासाठी, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांहून कमी नसेल परंतु दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल ; आणि

(ख) दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी, दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल :

परंतु, अपराधसिद्धीच्या अशा आदेशानंतरही, जर असे उल्लंघन पुढे चालू राहिले तर, अशा उल्लंघनाच्या पुढील प्रत्येक दिवसासाठी, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढा आणखी दंड लादण्यात येईल.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



अपराधाची दखल घेणे.

**३३.** (१) कलम ३२ खालील सर्व अपराध हे दखलपात्र व बेजमानती असतील.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय, परिषदेने याबाबत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून लेखी तक्रार करण्यात आल्याखेरीज, या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची दखल घेणार नाही. **१९७४ चा २.**

हक्काचा गैरवापर.

**३४.** जर, नोंदणीकृत व्यवसायी नसलेली कोणतीही व्यक्ती, व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार व्यवसायीची, व्यवसायोपचारकाची किंवा भौतिकोपचारकाची किंवा व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार विषयक सल्लागाराची पद्धत अनुसरील किंवा तिचा वापर करील; अथवा मान्यताप्राप्त व्यवसायोपचारविषयक किंवा भौतिकोपचारविषयक अर्हता धारण न करणारी कोणतीही व्यक्ती, अशी व्यवसायोपचार किंवा भौतिकोपचार अर्हता दर्शविणाऱ्या किंवा अभिप्रेत असणाऱ्या पदवीचा किंवा पदविकेचा किंवा संक्षेपाक्षरांचा वापर करील तर, तिला अपराधसिद्धीनंतर,—

(क) पहिल्या अपराधाबद्दल, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची ; आणि

(ख) नंतरच्या अपराधाबद्दल, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची, किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात कसूर करणे.

**३५.** जिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल, अशी कोणतीही व्यक्ती, आपले नोंदणी प्रमाणपत्र किंवा नूतनीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र किंवा दोन्हीही, ताबडतोब स्वाधीन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील तर, तिला,अपराधसिद्धीनंतर, अशा कसुरीच्या प्रत्येक महिन्यास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

शासनाचे निदेश.

**३६.** (१) परिषद, या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा निदेशांचे पालन करील.

(२) या अधिनियमान्वये परिषदेने आपले प्राधिकार वापरण्याच्या व आपली कार्ये पार पाडण्याच्या संबंधात, परिषद आणि राज्य शासन यांच्यामध्ये कोणताही वाद उद्भवल्यास, अशा वादावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

परिषदेस निष्प्रभावित करण्याचा अधिकार.

**३७.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्नुसार परिषदेकडे किंवा तिच्या अध्यक्षाकडे वा उपाध्यक्षाकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये बजावण्यात तिने किंवा त्याने कसूर केली आहे, किंवा वारंवार कसूर केली आहे, अथवा या अधिनियमाद्वारे किंवा तद्नुसार तिला किंवा त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचे तिने किंवा त्याने अतिक्रमण केले आहे किंवा त्याचा गैरवापर केला आहे, अथवा कलम ३६ अन्वये राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात बुद्धिपुरस्सर किंवा पुरेशा कारणाशिवाय, कसूर केली आहे, असे कोणत्याही वेळी राज्य शासनाच्या निदर्शनास आले तर, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसचूनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी, परिषदेस निष्प्रभावित करील :

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



परंतु, या पोट-कलमान्वये अधिसूचना काढण्यापूर्वी राज्य शासन, परिषदेस, तिचे निष्प्रभावन का करु नये याविषयीची कारणे दाखविण्यासाठी पुरेसा वेळ देईल आणि परिषदेचे स्पष्टीकरण व हरकती, कोणत्याही असल्यास, विचारात घेईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये परिषदेचे निष्प्रभावन करणारी अधिसूचना प्रसिद्ध केल्यावर,—

(क) परिषदेचे सर्व सदस्य, त्यांचा पदावधी समाप्त झालेला नसला तरीही, निष्प्रभावनाच्या तारखेपासून, त्यांचे पद रिक्त करतील ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तरतुदींअन्वये, परिषदेकडून किंवा परिषदेच्या वतीने वापरता येतील असे सर्व अधिकार किंवा पार पाडता येतील अशी सर्व कर्तव्ये, निष्प्रभावनाच्या कालावधीमध्ये, राज्य शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा अशा व्यक्तींकडून वापरले जातील व पार पाडली जातील ;

(ग) परिषदेकडे निहित असलेली सर्व मालमत्ता निष्प्रभावनाच्या कालावधीत, राज्य शासनाकडे निहित होईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावनाचा कालावधी समाप्त झाल्यावर, राज्य शासनास,—

(क) त्यास आवश्यक वाटेल अशा आणखी परंतु, एकूण दोन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी निष्प्रभावनाचा कालावधी वाढविता येईल ; किंवा

(ख) तरतूद केलेल्या रीतीने नवीन परिषद स्थापन करण्याची उपाययोजना करता येईल.

**सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.**

**३८.** या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही कृतीसाठी, पूर्वोक्तप्रमाणे, राज्य शासन, परिषद, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, सचिव किंवा परिषदेचा अथवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी वा इतर कर्मचारी, यांच्याविरुध्द कोणताही वाद, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.**

**३९.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील. अशा नियमांमध्ये, ज्या बाबी नियमांद्वारे विहित करणे या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे आवश्यक असेल किंवा तशी अनुमती दिलेली असेल अशा सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम तो, करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहाचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि असा निर्णय ते **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**विनियम करण्याचा अधिकार.**

**४०.** (१) परिषदेस, तिला या अधिनियमान्वये आपले कार्य पार पाडणे शक्य व्हावे म्हणून आणि सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाशी किंवा तद्न्वये केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने करता येतील.

(२) विशेषकरुन आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येऊ देता अशा विनियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) परिषदेच्या मालमत्तेचे व्यवस्थापन ;

(ख) परिषदेचे लेखे ठेवणे व त्यांची लेखापरीक्षा करणे ;

(ग) व्यवसायोपचारक आणि भौतिकोपचारक यांची नोंदणी ;

(घ) परिषदेचे आणि तिच्या समित्यांचे कामकाज चालविण्यासाठी कार्यपद्धतीचे नियम ;

(ङ) समित्यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती, त्यांची कार्ये व कर्तव्ये ;

(च) निरीक्षकांची अर्हता, त्यांच्या नियुक्तीची कार्यपद्धती, त्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(छ) मान्यताप्राप्त व्यवसायोपचारक किंवा भौतिकोपचारक यांची अर्हता देण्यासाठी, कोणत्याही विद्यापीठामध्ये किंवा कोणत्याही संस्थेमध्ये घ्यावयाचे अभ्यास पाठ्यक्रम व द्यावयाचे प्रशिक्षण यांचा कालावधी, परीक्षांचे विषय आणि त्यातील प्राविण्याचा दर्जा ;

(ज) व्यवसायोपचारकांच्या किंवा भौतिकोपचारकांच्या अभ्यासाकरिता किंवा प्रशिक्षणाकरिता कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, सोयी, प्रशिक्षण आणि इतर सुविधा यांचा दर्जा ;

(झ) परीक्षा आयोजित करणे, परीक्षकांची अर्हता आणि अशा परीक्षांसाठी प्रवेशाच्या शर्ती ;

(ञ) कलम २५ अन्वये, व्यवसायोपचारक व भौतिकोपचारक यांनी पालन करावयाची व्यावसायिक वर्तणुकीची व शिष्टाचारांची मानके व अनुसरावयाची नीति-संहिता ;

(ट) कलम २९ खाली, ज्या रीतीने आणि ज्या शर्तींना अधीन राहून अपील दाखल करता येईल ती रीत व त्या शर्ती ;

(ठ) या अधिनियमान्वये अर्ज व अपील यांकरिता प्रदान करावयाची फी ;

(ड) विनियमाद्वारे करावयाची किंवा करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला कोणताही विनियम राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, विखंडित करु शकेल किंवा त्यात फेरबदल करु शकेल आणि त्यानंतर विनियम अंमलात असण्याचे बंद होईल किंवा त्यात त्यानुसार फेरबदल होतील.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**४१.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, परंतु या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसेल अशी, कोणतीही गोष्ट करता येईल ;

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर या कलमाखाली कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये केलेला प्रत्येक आदेश, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

———

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



## अनुसूची-एक

(कलम १७ पहा)

| अनु.- क्रमांक (१) | महाविद्यालयाचे / विद्यालयाचे नाव (२) | विद्यापीठाचे नाव (३) | भौतिकोपचार पदवी / पदविका (४) |
|---|---|---|---|
| १. | शेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय, व्यवसायोपचार विभाग, परळ, मुंबई-४०० ०१२. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. ओ. टीएच. |
| | | (२) मुंबई विद्यापीठ, मुंबई | बी. एससी. (ओ. टी.) |
| २. | टी. एन. वैद्यकीय महाविद्यालय, व्यवसायोपचार विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. ओ. टीएच. |
| | | (२) मुंबई विद्यापीठ, मुंबई. | बी. एससी. (ओ. टी.) |
| ३. | व्यवसायोपचार विद्यालय व केंद्र एल.टी.एम. वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई-४०० ०२२. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. ओ. टीएच. |
| | | (२) मुंबई विद्यापीठ, मुंबई. | बी. एससी. (ओ. टी.) |
| ४. | डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. ओ. टीएच. |
| ५. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व्यवसायोपचार विभाग, नागपूर-४४० ००१. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. ओ. टीएच. |
| | | (२) नागपूर विद्यापीठ, नागपूर. | बी. एससी. (ओ. टी.) |
| ६. | भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालय, औरंगाबाद. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. ओ. टीएच. |
| ७. | नवलभाऊ प्रतिष्ठानचे भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालय, धुळे. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. ओ. टीएच. |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



## अनुसूची-दोन

(कलम १७ पहा)

| अनु-क्रमांक (१) | महाविद्यालयाचे / विद्यालयाचे नाव (२) | विद्यापीठाचे नाव (३) | भौतिकोपचार पदवी / पदविका (४) |
|---|---|---|---|
| १. | शेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई-४०० ०१२. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.<br>(२) मुंबई विद्यापीठ, मुंबई | बी. पी. टीएच.<br>बी. एससी. (पी. टी.) |
| २. | टोपीवाला नॅशनल मेडिकल महाविद्यालय, मुंबई सेंट्रल, भायखळा, मुंबई-४०० ००८. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.<br>(२) मुंबई विद्यापीठ, मुंबई. | बी. पी. टीएच.<br>बी. एससी. (पी. टी.) |
| ३. | भौतिकोपचार अध्यापन व उपचार केंद्र, एल.टी.एम. मेडिकल महाविद्यालय, वीर लक्ष्मीबाई केळकर मार्ग, सायन, मुंबई-४०० ०२२. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.<br>(२) मुंबई विद्यापीठ, मुंबई. | बी. पी. टीएच.<br>बी. एससी. (पी. टी.) |
| ४. | भौतिकोपचार विद्यालय व केंद्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर-४४० ००३. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.<br>(२) नागपूर विद्यापीठ, नागपूर | बी. पी. टीएच.<br>बी. एससी. (पी. टी.) |
| ५. | व्ही.एस.पी.एम. चे भौतिकोपचार महाविद्यालय, हिंगणे रोड, नागपूर. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.<br>(२) नागपूर विद्यापीठ, नागपूर. | बी. पी. टीएच.<br>बी. एससी. (पी. टी.) |
| ६. | संचेती भौतिकोपचार महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.<br>(२) पुणे विद्यापीठ, पुणे. | बी. पी. टीएच.<br>बी. एससी. (पी. टी.) |
| ७. | भौतिकोपचार महाविद्यालय, निगडी, पुणे. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.<br>(२) पुणे विद्यापीठ, पुणे. | बी. पी. टीएच.<br>बी. एससी. (पी. टी.) |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY



**अनुसूची-दोन**-(चालू)

(कलम १७ पहा)

| अनु-क्रमांक (१) | महाविद्यालयाचे / विद्यालयाचे नाव (२) | विद्यापीठाचे नाव (३) | पदवी / पदविका (४) |
|---|---|---|---|
| ८. | डॉ. डी. वाय. पाटील यांचे चैतन्य भौतिकोपचार महाविद्यालय, पिंपरी, पुणे. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. पी. टीएच. |
| | | (२) पुणे विद्यापीठ, पुणे. | बी. एससी. (पी. टी.) |
| ९. | प्रवरा भौतिकोपचार महाविद्यालय, लोणी (बु.), अहमदनगर. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. पी. टीएच. |
| | | (२) पुणे विद्यापीठ, पुणे. | बी. एससी. (पी. टी.) |
| १०. | रवी नायर भौतिकोपचार महाविद्यालय, सावंगी (मेढे), वर्धा. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. पी. टीएच. |
| ११. | डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे वैद्यकीय महाविद्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. पी. टीएच. |
| १२. | भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार महाविद्यालय, औरंगाबाद. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. पी. टीएच. |
| १३. | रामराव आदिक शिक्षण संस्थेचे डॉ. डी. वाय. पाटील, भौतिकोपचार महाविद्यालय, नवी मुंबई. | (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. | बी. पी. टीएच. |

शामुको.— एच १९३-२४४७ (पु.)—३.२०१३

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते